पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम ता.जि.वाशिम
कार्यालय दुरध्वनी क्र ०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

**प्रेस नोट** **दिनांक :– १६/०२/२२**

**मानव व वन्यजिवन संघर्षाबाबत जिल्हास्तरीय व्याघ्र कक्ष समितीची सभा संपन्न**

राज्यातील वन्यजिवन संवर्धनासाठी वाघ व इतर वन्यप्राण्यांच्या अवैध शिकारीस व त्यांच्या अवयवांच्या चोरटया व्यापारास आळा घालण्यासाठी राज्यात राज्यस्तरीय व महसुल विभागस्तरीय /व्याघ्र कक्ष समिती स्थापन करण्यात येतात.

वाशिम जिल्हयात दिनांक ११/०२/२०२२ रोजी मा. पोलीस अधिक्षक वाशिम श्री.बच्चन सिंह यांचे अध्यक्षतेखाली पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम येथे जिल्हास्तरीय व्याघ्र कक्ष समितीची बैठक आयोजित करण्यात आली सभेमध्ये श्री. उत्तम फड सह–अध्यक्ष तसेच विभागीय वन अधिकारी दक्षता यवतमाळ, श्री. विपुल राठोड उप वन संरक्षक (प्रादेशिक) वाशिम,श्री गौरव कुमार इंगळे सदस्य मानद वन्यजिवन रक्षक यांचे उपस्थीत पार पडली. राज्यातील वन्यजीव संवर्धनासाठी, वाघ व इतर वन्यप्राण्यांच्या शिकारी/तस्करी व अवैध अवयवांच्या चोरटया व्यापारास आळा घालणे बाबत सर्व उपस्थित अधिकारी यांना सुचना देण्यात आल्या तसेच बैठकीत खालील मुदयावर चर्चा करण्यात आली.

सन २०२१ मध्ये वाघ/बिबटया शिकारीच्या प्रकरणाचा बाबत सविस्तर आढावा,वन्यप्राणी शिकार प्रकरण दाखल करुन किती प्रकरणात आरोपीना अटक केली,वन्यप्राण्यांच्या अवयवांची तस्करी प्रकरणी नोंद वन गुन्हे प्रकरणाची सदयस्थिती,वन अधिकारी/कर्मचारी यांना शस्त्र संबंधीत प्रशिक्षणा बाबत आढावा,वनसंरक्षण करताना वन अधिकारी/कर्मचारी यांचेवर झालेल्या हल्लया बाबत माहिती,पिकांचे संरक्षणार्थ तारेचे कुंपणातुन विदयुत प्रवाह सोडण व अशा विदयुत प्रवाहामुळे झालेल्या, वन्यप्राण्यांचे मृत्युंची सन २०२० व २०२१ या वर्षातील प्रकरणाबाबत चर्चा करण्यात आली,वन जमिनिवरील अतिक्रमणे हटविताना पोलीस विभागाकडुन अपेक्षित सहकार्याविषयी चर्चा,वनसंरक्षणाच्या कार्यवाही संबंधी वन कर्मचाऱ्याविरुध्द पोलीस विभागाकडुन दाखल प्रकरणांचा आढावा,उपवनसंरक्षक यांचे कार्यक्षेत्रातील संघटीत वन गुन्हेगारी विषयी आढावा,आंतरराज्य सिमेवरील वनसंरक्षणा विषयी समस्या या विषयावर चर्चा करण्यात आली.

तसेच पोलीस विभागामार्फत दिनांक ०९/०२/२०२२ अनसिंग ते पिंपळगाव रोडवरील खडसिंग गावाजवळील शेत शिवारातुन बेहडा या आडजातीच्या झाडाचे खोड विनापरवाना बेकायदेशीररित्या कटाई करत असताना पोलीसांना मिळुन आले आडजातीच्या झाडाचे खोड वाहुन नेण्याचा कोणत्याही प्रकारचा परवाना नसल्याने त्यांना ताब्यात घेऊन वनविभागास पत्रव्यवहार करुन कायदेशीर करण्याबाबत कळविले.

दिनांक १४/०२/२२ रोजी सकाळी काकडशिवणी शेत शिवारात वन्यप्राणी लोखंडी शिकारी सापळयामध्ये बिबटया अडकलेल्या अवस्थेत मिळुन आला नमुद बिबटयाला वन्यप्राणी रेस्क्यु टिमचे मदतीने बिबटल्या सापळयातुन बाहेर काढुन औषधोपचार करुन पुन्हा जंगलात सोडण्यात आले. सामान्य नागरिक आणि पोलीसांच्या सर्तकतेमुळे वेळीच बिबटयाला मदत उपलब्ध मिळाल्याने बिबटयाचे प्राण वाचले.

वन्यजिवन संरक्षणाकरीता अधिकाअधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज असुन त्यानुसार स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा व्याघ्र कक्षा मार्फत वन्यप्राणी विषयक गुन्हयास प्रतिबंध घालण्यासाठी तथा होणाऱ्या गुन्हयांना आळा बसावा या करीता त्वरीत तपास करुन गुन्हेगारांना त्वरीत कडक शासन होण्यासाठी शासनाच्या वन्यविभाग पोलीस विभाग,पशु संवर्धन विभाग, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ, जिल्हा परिवहन विभाग यांच्यामध्ये समन्वय साधुन गुन्हेगारीस आळा घालणे आवश्यक असल्याचे तसेच वनविभाग अंतर्गत मानव व वन्यजिवन संघर्षाचे अनुषंगाने लोकांमध्ये भिती निर्माण होवुन असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्यास आपणास पोलीस विभागमार्फत सर्वतोपरी मदत केली जाईल असे मा.पोलीस अधिक्षक बच्चन सिंह व्याघ्र कक्ष समिती अध्यक्ष यांनी सांगितले.

पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा वाशिम